# श्रीराम टाईल वर्क्स

**मू.पो.खेर्डी, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी, 415604**

**श्रीकांत फडके - 9765039308** **विजय जोगळेकर - 9422430197**

# डाळींब बागेत डिफ्युजर न बसविल्यामुळे होणारे तोटे!

परिपूर्ण फलोत्पादन तंत्रज्ञान म्हणजे डिफ्युजर तंत्रज्ञान. या तंत्रज्ञानाची माहिती मिळूनही अनेक बागाइतदार, "तंत्रज्ञान पटले आहे पण खर्च जास्त येतो/ पैसे नाहीत त्यामुळे डिफ्युजर बसविता येत नाहीत" असे म्हणत या प्रभावी तंत्रज्ञानाचा आपल्या बागेत वापर करीत नाहीत. त्यामुळे त्यांना डिफ्युजरच्या किंमतीच्या काही पट नुकसान विविध प्रकारे दरवर्षी / वर्षानुवर्षे सहन करावे लागत असते. हे चोर पावलाने होणारे नुकसान समजतही नाही. डिफ्युजर न वापरल्याने कसे व कोठे कोठे नुकसान होते हे बागाइतदारांनी समजून घ्यावे यासाठी या लेखात त्याचा तपशील दिला आहे. हा तपशील ५ वर्षाच्या डाळींब बागेचा एकरी ३२० झाडे (केशरी) व्हरायटीचा आहे.

| अ. क्र. | डिफ्युजर न वापरल्याने होणाऱ्या नुकसानीचा तपशील | एकरी एका वर्षाचे नुकसान रुपयांत |
|---|---|---|
| १ | डिफ्युजर तंत्रामुळे ८५% पाणी बचत हाते. डिफ्युजर नसतील तर एका एकराला एका सीझनला २५ लाख लिटर पाणी लागते.डिफ्युजर असतील तर चांगल्या उत्पादनासाठी केवळ १० लाख लीटर पाणी पुरते. त्यामुळे जादा लागणाऱ्या १५ लाख लिटर पाण्याची (एक हजार लीटरला रु.१०/- प्रमाणे) रु.१५०००/- किंमत होते. | रु. १५०००/- |
| २ | पचवीस लाख लीटर पाण्यांत डिफ्युजर तंत्राने किमान २ एकर डाळींब बाग होते पण डिफ्युजर न बसविल्यामुळे ते सर्व पाणी एक एकर क्षेत्रासाठी वापरावे लागते व दुसऱ्या एकरामध्ये उत्पन्न घेता येत नाही. त्यामुळे किमान एक लाख रुपयांचे नुकसान होते. | १,००,०००/- |
| ३ | डिफ्युजरच्या वापरामुळे झाडा खाली गवत वाढत नाही, जमीनही घट्ट होत नाही त्यामुळे गवत काढणी, खुरपणी ही कामेच नाहीशी होतात. परंतु डिफ्युजर न वापरलेल्या बागेत हा खर्च करावाच लागतो. | १२,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | (८०दिवस १ माणुस १५०/-रु. रोजाप्रमाणे) | |
| ४ | डिफ्युजर तंत्रामुळे दिलेल्या खतापैकी ९५% खते झाडा कडुन उचलली जावून वापरली जातात. डिफ्युजर वापरले नाहीतर ३५ ते ४०टक्के खतेच वापरली जातात त्यामुळे जादा खते वापरावी लागतात. त्याची किंमत | रु. १०,०००/- |
| ५ | डिफ्युजर तंत्रात परिपूर्ण पोषण केले जाते त्यामुळे झाडे मजबूत होतात व कमी औषधे लागतात. औषध बचतीची किमान किंमत | ३०००/- |
| ६ | बागेत डिफ्युजर वापरले तर डाळींब तडकण्याचे प्रमाण नगण्य असते. परंतु डिफ्युजर वापरले नाही तर पाणी कमी जास्त होते व डाळींब तडकतात. प्रती झाड २ किलो या प्रमाणे एकरी ६०० किलो डाळींबे तडकून नष्ट होतात. त्याची रु. ५०/- प्रति किलो प्रमाणे किंमत | ३००००/- |
| ७ | डिफ्युजर तंत्रात दोन वर्षातून एकदाच बेड करावे लागतात. त्यामुळे मजुरी व शेणखतात बचत होते. तो खर्च प्रती झाड रु. २०/- धरला तर जादा होणारा खर्च | ६०००/- |
| ८ | डिफ्युजर तंत्र समजून वापरल्यास नेहेमीच्या दुप्पट उत्पादन मिळते. सर्वसाधारण व्यवस्थापन करुन देखील दीड पट उत्पन्न मिळते. एकरी २ ते ३ टन जादा उत्पादन मिळते. दोन टनाची रु.५०/- प्रति किलो प्रमाणे किंमत (जी डिफ्युजर न वापरल्यास मिळत नाही. ) | १,००,०००/- |
| ९ | डिफ्युजर तंत्रात फळांचा दर्जा चांगला असतो. वजन असते. तकाकी / तेज असते. त्यामुळे जादा दर मिळतो. प्रती किलो केवळ दोन रुपये जादा दर मिळाला असे धरले तर १० टनांवर रु. २००००/- जादा मिळतात. डिफ्युजर न वापरण्याचे हे नुकसान होते | २०,०००/- |
| | आपल्या डाळींब बागेत डिफ्यूजर न वापरल्याने होणारे प्रती एकरी दरवर्षी होणारे नुकसान एकूण रुपये | रु. २,९६,०००/- |

वरील सर्व खर्च प्रत्यक्षापेक्षा कमी दराने धरले आहेत. तसेच एकरी उत्पन्नही कमीच धरले आहे. तरी देखील डिफ्युजर न वापरल्याने एकरी प्रतीवर्षी रु.२,९६,०००/- इतके बागाईतदाराचे चोरपावलाने नुकसान होत असते. यावर विश्वास बसणे कठीण आहे. पण हे सत्य आहे. जेवढी वर्षे डिफ्युजर वापरले जाणार नाही तेवढी वर्षे हे नुकसान होतच रहाते. डिफ्युजर किमान २५-३० वर्षे टिकतात. त्याचा खर्च पहिल्याचवर्षी अनेक पटीने वसूल होत असतो. प्रत्येक बागाइतदाराने वरील कारणांमुळे जे नुकसान होते त्याचा लेखाजोखा स्वत:च मांडावा. हे नुकसान दिसत नाही पण होत असतेच. त्यामुळे 'डिफ्युजरसाठी पैसे नाही' अशी सबब सांगणे योग्य आहे का याचा विचार करावा.

डिफ्युजरमुळे वर दिलेले फायदे मिळतात की नाही हे पहाण्यासाठी ज्यांनी डिफ्युजर बसविले आहेत त्यांचे बागेत समक्ष जावुन खात्री करुन घ्यावी. नंतर पैसे नाही म्हणून डिफ्युजर बसवावयाचे नाहीत, असे करण्याऐवजी डिफ्युजरसाठी आवश्यक तेवढे पैसे प्रयत्नपूर्वक उभे करुन हे परिपूर्ण फलोत्पादन तंत्रज्ञान आपल्या बागेत राबवून त्याचा फायदा घ्यावा व नुकसान टाळावे असे सुचवावेसे वाटते.

डिफ्यूजर तंत्र बागेत वापरल्यामुळे ज्याची पैशात किंमत करता येत नाही असे महत्वाचे अनेक फायदे होतात. त्याचा तपशील देत आहे.

१. झाडांचे आरोग्य सुधारते, कारण डिफ्यूजर तंत्रात आपण सर्व तेरा अन्नद्रव्ये प्रत्येक वेळी झाडाच्या आंत जातील अशा पध्दतीने देत असतो.
२. झाडाच्या वाढीचा वेग दुप्पट होतो कारण झाडे पूर्ण क्षमतेने अन्नद्रव्य घेतील असे आपण व्यवस्थापन करतो. प्रती एक ग्रॅम शोषल्या गेलेल्या अन्नद्रव्यापासून झाड १०० ग्रॅमने वाढत असते. वाढीचा वेग जास्त मिळत असल्याने आपण लागवडीपासून एक वर्षाच्या आंत बहर घेऊ शकत असतो व त्यातून नेहमीच्या दीडपट उत्पादन सहजपणे मिळवू शकत असतो. सुरुवातीपासून डिफ्युजर तंत्रावर वाढविलेली बाग ७/८ वे वर्षीच एकरी १५ टन उत्पादन देण्याइतकी सक्षम होते. आपण विश्रांतीच्या काळांत देखील डिफ्युजर तंत्राने झाडाचे खोड जाड करुन घेत असतो आणि उत्पादनाच्या काळांत चांगले उत्पादन घेऊन देखील झाड रिकामे होऊ देत नाही.
३. डिफ्युजर तंत्राने ताणाच्या काळांत अल्प प्रमाणांत (१ ते २ लीटर) पाणी देऊन त्यातून विशिष्ट अन्नद्रव्ये झाडाच्या आंत पोचवून आपण काडी चांगली तयार करुन घेतो. झाडांत कर्बोदकाचा चांगला साठा झाल्यामुळे ताण सोडल्यावर मोठा कळा येतो व मोठे फळ सहजपणे मिळते. तसेच मादी फुलांचे चांगले प्रमाण मिळते.

४. फळांची पक्वता बाजाराच्या गरजेप्रमाणे लवकर वा उशीरा करता येते त्यामुळे हुकमी चांगला दर मिळविता येतो.

५. झाडांच्या मुळांना डिफ्युजर तंत्रात सतत ऑक्सिजनचा पुरवठा होत रहातो त्यामुळे फळांना आगळे तेज येते व बाजारांत चांगला दर मिळतो. कित्येक वेळा फळांच्या दर्जामुळे व्यापारी बागेत येऊन चांगला दर देऊन व आधी पैसे देऊन फळे तोडून नेतात.

६. अति अडचणीच्या काळांत प्रती झाड रोज केवळ १/२ लीटर इतके कमी पाणी देऊन बाग जगविता येते.

७. जमीनीचे आरोग्य चांगले राखता येते.

बागेत डिफ्युजर तंत्र न वापरल्याने विविध प्रकारे नुकसान होत असते. असे पैशांत न मोजता येणारे नुकसान खालील प्रकारचे असते.

१. परिपूर्ण पोषण करता येत नसल्यामुळे झाडे अशक्त व निस्तेज होतात व चटकन रोगाला बळी पडतात.

२. डिफ्युजर नसलेल्या बागेत मुळ कुजव्या व मर रोगाचा कायम त्रास होतो.

३. खताची संपूर्ण उचल होत नसल्यामूळे ती जमीनीत पडून रहातात व जमीनीचे आरोग्य बिघडवतात. त्याचा परिणाम पुढील प्रत्येक सीझनमधील उत्पादनावर होत रहातो. व मालाचा दर्जा खालावतो आणि उत्पादन कमी मिळते. सहाजिकच उत्पन्न कमी मिळते.

४. कधी कधी प्रती एकर लागणारे २५ लाख लीटर पाणी उपलब्ध करुन घेता येत नाही त्यामुळे अखेरच्या टप्प्यांत बाग सोडून द्यावी लागते किंवा टँकरच्या पाण्यासाठी अतोनात खर्च करवा लागतो. सीझन पूर्ण न करता आल्यामुळे उत्पन्नाचे नुकसान होते त्याचा बागाईतदाराच्या मनस्वास्थावर परिणाम होतो आणि कुटूंबावरही परिणाम होत.

या सर्व बाबींचा विचार करुन डिफ्युजरबाबत निर्णय करवा असे पुन्हा एकदा सुचवावेसे वाटते. आपण डिफ्युजर न घेतल्याने कंपनीचे काहीच नुकसान होत नसते कारण डिफ्युजर घेणारे अनेक ग्राहक असतात. तसेच डिफ्युजर हे कंपनीच्या अनेक उत्पादनापैकी एक उत्पादन आहे हेही समजून घ्यावे.

डिफ्युजर वापरणारे बागाईतदार डिफ्युजर तंत्रचा अनुभव घेतल्यानंतर "डिफ्युजर नशीबवान बागाइतदाराच्या बागेतच बसतात/ बसविले जातात" असे म्हणतात. ते अक्षरशः खरे आहे. आपले नशीब आपल्या निर्णयातुनच घडत असते. त्यामुळे त्या "नशीबवान" बागाइतदाराच्या पक्तींत आपण जावून बसावयाचे की नाही याचा निर्णय आपण घ्यावा.